RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 July 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 July 2014

# अजायब ✸ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : पहिला | जुलै २०१४




| | |
|---|---|
| सोहणा सोहणा मुखड़ा (भजने गाण्याविषयी संदेश) | 4 |
| प्रभु (सत्संग) | 7 |
| गुरुस्वरुपास अंतर्यात कसे प्रगट करावे?(प्रश्नोत्तरे) | 25 |
| अमृतवेळ (ध्यान-अभ्यासापूर्वी दिलेला संदेश) | 34 |
| धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) | 34 |


मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

# सोहणा सोहणा मुखड़ा

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींना भजने गाण्याच्या कार्यक्रमात
दिलेला संदेश – अहमदाबाद, ऑक्टोबर १९९२

१. सोहणा–सोहणा मुखड़ा ते सोहणी–सोहणी खिच्च वे,
रूह पई उड्डे हवा दे विच वे, (२)
आ सचमुच, (२) दर्श दिखा दाता, मैं दिल दे दु:खड़े फोलां,
इक वारी, आ इक वारी वेहड़े वड़ दाता, मैं वांग पपीहे बोलां,
इक वारी, आ इक वारी, अक्सियां च वस दाता
मुड़ फेर कदी ना खोलां .....

२. वारो वारी कई–कई जन्मां च पई मैं,
जागे मरे भाग तेरे चरनां च आई मैं, (२)
हुण रख लो, आ रख लो रख लो रक्ख दाता,
मुड़ फेर कदी ना रोलां,
इक वारी आ इक वारी .....

३. सच्चा सुच्चा सावन ते सच्चा कृपा वे,
आ गया 'अजायब' तेरे दर ते कंगाल वे, (२)
करां लख–लख, करां लख–लख वारी यश दाता,
तेरे दर ते जिंदड़ी घोलां,
इक वारी आ इक वारी .....

आता प्रेमीने भजन म्हटले. सेवकाच्या अंतरात जेव्हा सतगुरू भेटीची खरी तळमळ निर्माण होते, तो हृदयाचे अंगण सतगुरूंच्या आगमनासाठी तयार करतो आणि सतगुरूंना हाक मारतो की, एकदा तरी तुम्ही माझ्या हृदयाच्या अंगणात पदार्पण करा, तेव्हा मी माझ्या हृदयातील तुमच्याप्रती असलेल्या भावना तुमच्या समोर सादर करीन.

जी सतगुरू भेटीसाठी असलेली तळमळ या भजनामध्ये दर्शवलेली आहे, तशी तळमळ जर सेवकाच्या अंतरात निर्माण झाली तर सतगुरू व सेवकाच्या दरम्यान कोणतेही अंतर राहत नाही. सतगुरू सेवकाच्या हृदयरूपी अंगणात प्रवेश करण्यासाठी नेहमी तयार असतात. कमतरता तर आपल्यात आहे, कारण आपल्या अंतरात तितकी गुरूंकरीता तळमळ, गुरुंचे स्मरण व गुरूंप्रती श्रद्धा नसते, जितकी सतगुरू भेटीसाठी असणे जरुरी असते.

आपणांस संत–महात्म्यांच्या भजनांद्वारे तसेच जीवनचरित्रांद्वारे अशी शिकवण मिळते की जे काही आपल्या हृदयात असते, तेच आपल्या वाणीमध्ये येते. संतांच्या हृदयात त्यांच्या गुरूंप्रती जे प्रेम व जी आभारास्पद भावना होती, ती भावना त्यांनी त्यांच्या लिखाणाद्वारे व्यक्त केली. प्रेमीच्या अंतर्यात सतगुरू भेटीची तळमळ जेव्हा निर्माण होते, तेव्हा तो प्रेमी सतगुरूंच्या आश्रमाच्या दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यासदेखील निरोप देतो की तू माझ्या सतगुरूंना माझा हा निरोप दे. आश्रमाच्या दिशेने एखादे जनावरदेखील जात असेल तर तो प्रेमी त्या जनावरास सांगतो, प्रिय मित्रा! तू माझ्यासाठी थोडेसे कष्ट घे व माझ्या प्रिय गुरूंना माझा निरोप दे.

ही सेवकासाठी एक सुवर्णसंधी असते. सेवक जेव्हा सतगुरूंची आठवण काढत असतो, तेव्हा त्याचे हृदय प्रफुल्लीत असते, नेत्रांमध्ये प्रेमाश्रु जमलेले असतात तर त्याचा कंठ दाटून येतो. अशी सेवकाची अवस्था अवर्णनिय असते. त्या अवस्थेविषयी केवळ तोच सेवक जाणतो वा ज्या सतगुरूंसाठी त्याच्या नेत्रांमधून प्रेमाश्रु वाहत असतात, ते सतगुरूच जाणतात. अशावेळी सतगुरूंनादेखील राहवले जात नाही. ते सेवकाच्या प्रेमाचा व तळमळीचा आदर करतात व सेवकाच्या जवळ येऊन त्याची तळमळ शांत करतात तसेच त्याच्या हृदयामध्ये आसनस्थ होतात.

अहमदाबादचा सत्संगाचा कार्यक्रम जेव्हा निश्चित झाला, तेव्हापासून तुम्हा लोकांनी आपल्या अंतरात खूप तळमळ निर्माण केली. ही तळमळ

निर्माण होण्यामागे परमात्मा कृपालजींची कृपाच कार्यरत आहे. ते स्वतःच संगतमध्ये तळमळ निर्माण करतात आणि स्वतःच व्यवस्थादेखील करतात. या! त्यांनी कृपा करून आपल्या अंतर्यात जी तळमळ निर्माण केली आहे, त्या तळमळीचा फायदा करून घेत आपण प्रत्येक मिनिट–सेकंद, निद्रावस्थेत वा जागृतावस्थेत त्यांच्या आठवणीमध्ये व्यतित करूया.

तुमच्यासोबत ध्यान–अभ्यासासाठी, सतगुरूंच्या आठवणीत बसताना मला अतिशय आनंद होतो. आपणांस कल्पना आहे की ज्यांच्या अंतर्यात सतगुरू स्थानापन्न आहेत, तेच प्रेमी सतगुरूंच्या आठवणीत बसतात. तुम्हांस जाणीव आहे की आज भजने गाण्याचा कार्यक्रम आहे. सर्वांच्या हृदयात तळमळ आहे. ज्यांना भजन गाण्याची संधी लाभेल, त्यांनी त्या संधीचा लाभ घ्यावा. भजन म्हणण्यास सुरूवात करण्यापूर्वी पुस्तकातील पानाचा अनुक्रमांक जरूर सांगावा. पानाचा अनुक्रमांक सांगितल्याने इतर प्रेमींना पुस्तकामध्ये पाहून भजन म्हणणे सोपे जाते.

जी सतगुरु प्यारे आ मिलो मैनूं, (२) तरस रही जान है मेरी, (२)

१. जी तेरा कीता जातो मैं नहीं, (२) जी मैंनू जोग कीतोई (२)
जी सतगुरु प्यारे

२. जी निरगुण हारे कोई गुण नाहीं, (२) जी आपै तरस पेयोई, (२)
जी सतगुरु प्यारे

३. जी तरस पया मैं रहमत होई, (२) जी सतगुरु साजन मिलया, (२)
जी सतगुरु प्यारे

४. जी 'नानक' नाम मिलै तां मैं जीवां, (२) जी तन–मन थीवै जी हराया, (२)
जी सतगुरु प्यारे

मी माझ्या सतगुरूंचे आभार मानतो, ज्यांनी आपणांस त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली. तुम्ही आता नेत्र बंद करून ध्यान–अभ्यास करा.

***

# प्रभु

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी, हैदराबाद – १३ जानेवारी १९९०

मी कालही स्वामीजी महाराजांच्या वाणीवर सत्संग केला होता, आज देखील सत्संगासाठी त्यांचीच वाणी घेतली आहे. परमात्म्यास प्रिय असलेले संत–महात्मे त्यांच्या स्वत:च्या कार्यपूर्तीसाठी या जगात येत नाहीत, तर ते केवळ **प्रभु**–परमात्म्याचा संदेश या जगास देण्यासाठी येतात. ते कोणत्याही एखाद्या विशिष्ट जात, धर्म वा प्रदेशाशी बांधील नसतात. त्यांचे हृदय अतिशय विशाल असते. त्यांची नजर आपल्या आत्म्यावर असते.

आपला आत्मा हा परमात्म्याचे निर्दोषी बाळ आहे. खरेतर जे काही अवगुण असतात, ते आपल्या मनात असतात. आपणांस कल्पना आहे की, काळाने या जगात कशा रितीने वादविवादांचा प्रसार केलेला आहे. त्याने वेगवेगळे समाज निर्माण केलेले असून, निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये दुही निर्माण केली आहे की, अमुक एकाच भाषेचा वापर सर्वांनी करावा, इतर भाषा वापरू नयेत, एक ठराविक पोथीच ऐकावी, इतर पोथ्या ऐकू नयेत. परंतु संत–महात्मे या वादाचा दोन ओळींमध्येच निर्णय करून टाकतात:

***होय एकत्र मिलो मेरे भाई, दुविधा दूर करो लिव लाई ।***
***हरनामों की होवो जोड़ी, गुरूमुख बैठो सफा बिछाई ।।***

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात प्रियजनहो! जे आत्मा काळाच्या प्रभावाखाली असतात, त्या आत्म्यांना त्याने भूल टाकलेली असते. खरे तर हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, अमेरिकन तसेच हिंदुस्थानी या सर्वांचा परमात्मा एकच आहे. कबीर साहेब सांगतात:

***एक नूर ते सब जग उपजया कौन भले कौन मंदे ।***

सर्व विश्वाची निर्मिती एकाच दैवी प्रकाशकिरणापासून झालेली आहे. मग कोणास वाईट व कोणास चांगले म्हणावे? सर्वांना एकाच **प्रभुची** लेकरे

का समजू नये? आपण जोपर्यंत परमात्म्याशी एकरूप होत नाही, त्यास आपल्या अंतर्यात प्रकट करीत नाही, तोपर्यंतच एकमेकांना चांगला-वाईट असे संबोधत राहातो. गुरू नानक देवजी महाराज म्हणतात:

***बुरा भला तिच्चर आखदा जिच्चर है दो माहें ।***
***गुरुमुख इक पछाणेया इको माहें समाहे ।।***

ज्या महात्म्यांना **प्रभु**परमात्म्याचे आकलन होते, जे त्याच्याशी एकरूप होतात, त्या महात्म्यांना सर्वच ठिकाणी, अगदी झाडाच्या पानापानांमध्ये देखील परमात्मा दिसू लागतो. मी एका भजनामध्ये म्हटले आहे:

***कोने-कोने ते मैं फिरया, नूर तेरा हर थां मिलया ।***

हे परमात्मा! विश्वाधिशा! तुमच्या कृपेने मला सर्व जगात फिरण्याची संधी लाभली. मी ज्या कोणत्या ठिकाणी गेलो, तेथे मला तुझाच प्रकाश आढळला. मी प्रत्येक ठिकाणी हेच सांगितले की मी स्वत:चे असे कोणतेही विशिष्ट कार्य घेऊन आलेलो नाही. मी जे काही कार्य करीत आहे, ते महान संत सावन-कृपालजींचे कार्य असून, मज गरीब आत्म्यास त्यांच्या चरणी बसण्याची संधी लाभली. मला जे काही प्रेम त्या महापुरुषांनी दिले, ते प्रेम तुम्हा लोकांमध्ये वाटण्यासाठी मी येथे आलेलो आहे. मी त्यांचाच संदेश तुम्हांस देण्यासाठी आलेलो आहे. मी एका कळसूत्री बाहूल्याप्रमाणे आहे, माझी दोरी त्या गुरूदेव महापुरुषांच्या हातात आहे. ते मला जेथे पाठवितात तेथे मी जातो, जिथे ठेवतात तेथे मी रहातो. हा सर्व त्यांचाच खेळ आहे.

गुरुसाहेबांच्या वाणीत येते की आपण तोंडाने तर गोडगोड बोलतो परंतु आपल्या अंतरात विषाचे झरे वहात असतात. **प्रभु**-परमेश्वर सर्वांच्या अंतरात आहे असे सांगणे फार सोपे असते, परंतु आपण त्याप्रमाणे वागत नाही. म्हणून सर्वसाधारण लोकांच्या मनात घृणा निर्माण होते की यामनुष्याने किती छान भाषण दिले, हा सर्वांना सांगायचा की सर्वांचा **प्रभु** परमेश्वर एकच आहे, परंतु हे सर्व केवळ सांगण्यापुरतेच आहे. संतांनी आपल्या जीवनात प्रात्यक्षित केलेले असते.

मी नेहमी सांगतो की सर्व संत जगास आणि त्यातील सर्व समाजांस आपलाच मानतात. ते कोणत्याही समाजाची निंदा करीत नाहीत. महात्म्यांच्या संगतमध्ये कोणताही रिती–रिवाज केला जात नाही वा कर्मकांड शिकविले जात नाही. महात्मा प्रात्यक्षितावर विश्वास ठेवतात. ते स्वत: अंधविश्वासात राहात नाहीत व आपणांसही अंधविश्वास ठेवण्यास सांगत नाहीत, किंबहुना ते आपणांस प्रेमाने सांगतात,''स्वत: करा व स्वत: अनुभवा.''

आपले सत्गुरू महाराज कृपाल सांगत असत, ''जे काम एक मनुष्य करू शकतो, तेच काम दुसरा मनुष्यदेखील करू शकतो. प्रत्येक मनुष्य तशी अपेक्षा करू शकतो, **प्रभु** सर्वांसाठी एकच आहे. तो सर्वांच्या अंतर्यात स्थानापन्न असून त्यास भेटण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.''

संत कधीच दावा करीत नाही की **प्रभु**प्रेम केवळ त्यांनाच प्राप्त आहे. हे देखील सत्य नाही की परमात्म्याने त्याच्या मिलनाचा अधिकार कोणा एका खास धर्मास दिला आहे व त्यास इतर धर्मीय भेटू शकणार नाहीत. परमात्मा भेटीचा अधिकार जेवढा एका पुरुषास आहे, तेवढाच एका स्त्रीसदेखील आहे. आपण सर्वजण **प्रभु**प्रेम प्राप्त करू शकतो,प्रभु सर्वांच्या अंतर्यात आहे. स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे, लक्षपूर्वक ऐका:

**सावन आया मास दुसरा । सास मरी घर आया ससुरा ।।**

स्वामीजी महाराज सांगतात, आपणांस नाम प्राप्त झालेले असल्यास, अंतसमयी आपल्या अंतर्यात ध्वनी प्रगट होतो, आपल्या आशा आणि तृष्णा नाहीशा होतात. बऱ्याच सत्संगींच्या अंतसमयी अनुभव येतो की त्यांचे ध्यान अगोदरच अंतर्यात एकाग्र होते. परिवारातील लोक त्यास कामधंद्याबद्दलच्या गोष्टी सांगतात, परंतु तो तेथे लक्ष देत नाही. त्याच्या आजूबाजूस गैरसत्संगी बसलेला असल्यास तो बोलतदेखील नाही. मात्र एखादा ध्यान–अभ्यासू व्यक्ती बाजूस बसलेला असल्यास तो त्या प्रेमीस प्रेमाने सांगतो, ''अंतर्यात ध्वनी प्रगट झालेला आहे, मला नेण्यासाठी सतगुरू आलेले आहेत.''

भरपूर ध्यान–अभ्यास करणाऱ्या सत्संगी व्यक्तींना अनेक दिवसांपूर्वीच असा अनुभव येतो. नुकताच काही दिवसांपूर्वी घडलेला प्रसंग अनेक सत्संगींनी पाहिला आहे की पप्पुच्या वडिलांनी त्यांची या ईहलोकीची यात्रा काही दिवसांपूर्वीच पूर्ण केली. त्यास सतगुरूंवर किती आतोनात विश्वास होता! जाताना त्याने त्याच्या मुलांनादेखील सांगितले,''मुलांनो! सतगुरूंचा पदर, त्यांचा आसरा सोडू नका. संत–संगत सोडू नका.''

प्रियजनहो! जे लोक मेहनत करतात, ते अंतर्यात अनुभवही घेतात. जे नाम घेऊन केवळ शाब्दीक जमा–खर्च करतात व अपेक्षा ठेवतात की, त्यांच्या अंतसमयी सतगुरूंनी त्यांचा सांभाळ करावा. तुम्हीच विचार करा! सतगुरूंनी तुमच्याकडून काही ऋण घेतलेले नसते की त्यांनी त्याची परतफेड म्हणून तुमचा सांभाळ करावा! परंतु तरीही ते दयाळू असतात. ते आपला दया करण्याचा गुण सोडत नाहीत. ते येऊन प्रेमींचा सांभाळ करतातच. अंतर्यामध्ये जेव्हा ध्वनी प्रगट होतो, तेव्हा तो ध्वनी या सांसारीक गोष्टींचा मोह बाकी राहू देत नाही.

**काली घटा श्याम मन हुआ । श्याम कंज में यह मन मूआ ।।**

आता आपण प्रेमाने सांगता,''आपण आयुष्यभर विषय–विकार भोगले, मद्य–मांसाचा आस्वाद घेतला; मनास सांसारीक भोगांच्या पाशामध्ये अडकवून टाकले. मन काळ्या शाईप्रमाणे काळेकुट्ट झाले. असे असूनही आपण जर ध्यान–अभ्यास करून शब्दनामाची कमाई केल्यास, आपला आत्मा मन–इंद्रियांच्या पातळीवरून वर येतो, सहस्त्रदल कमळाच्या पहिल्या टप्प्यावर पोहोचल्यावर आपले मन निर्मळ होते व ते अंतर्यात ध्वनीशी एकरूप होते.''

**गरजे बादल चमके बिजली । मनसा मोड़ी आसा बदली ।।**

स्वामीजी महाराज प्रेमाने सांगत आहेत, ''जर घोर अंध:कारमय रात्र असली, वादळीवारे वाहत असले व अशा परिस्थितीमध्ये प्रवास करीत असताना आपण आपला मार्ग विसरलो, तर आपण गांगरून जातो. आपण

आपले घर, आपली वस्ती कोणत्या दिशेस आहे हे विसरून जातो, आपण दिशाहीन होतो. अशा वेळी आपण कुत्र्यांच्या भुंकण्याचा वा इतर प्रकारच्या आवाजाचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून त्या दिशेने आपले घर व वस्ती आहे असा अंदाज घेत आपण जातो.''

याजगात आपण मार्ग विसरून गांगरलेलो आहोत, वाटेत अनेक खड्डे-उंचवटे आहेत. अशा परिस्थितीत जर आपल्या हातामध्ये एखादी विजेरी (टॉर्च) वगैरे असल्यास आपण तो मार्ग सहजतेने पार करू शकतो. एखादा आवाज ऐकल्यानंतरच आपणांस दिशेचे आकलन होते. याचप्रमाणे **प्रभु**-परमात्म्याने आपल्या अंतर्यामध्ये ध्वनी तसेच प्रकाशाचे नियोजन केलेले आहे. प्रत्येक संत-महात्मा त्या ध्वनी व प्रकाशाचे वर्णन त्यांच्या वाणीमध्ये करतात. गुरू नानकदेवजी महाराज म्हणतात:

***अंतर जोत निरंतर बानी, सच्चे साहेब स्यों लिव लाई ।***

ती वाणी लिहिली, वाचली किंवा उच्चारली जाऊ शकत नाही. ती सर्वांच्या अंतर्यात आहे. गुरू नानकदेवजी महाराज एका ठिकाणी सांगतात :

***पूरे गुरु की सांची बानी, सुखमन अंदर सहज समानी ।***

आपण जेव्हा आपल्या विचारांना नऊ द्वारांमधून बाहेर काढून, आपल्या नेत्रांच्या मागे येतो व पहिल्या टप्प्यावर पोहोचतो, तेथे ध्वनी स्पष्टपणे ऐकू येतो. तो ध्वनी आपण आतादेखील ऐकू शकतो, परंतु तो आपणांस खेचू शकत नाही, कारण खेचणारी शक्ती आपल्या नेत्रांच्या वरच्या बाजूस आहे. परंतु आपण तुर्त या सांसारिक विषय-विकारांमध्ये, मान-मोठेपणात, काम-धंद्यात व्यस्त आहोत, त्यामुळे ध्वनी आपणांस वरती खेचू शकत नाही.

नामदान देतेवेळी सतगुरू सेवकांना पाचही मंडळांचे वर्णन विस्ताराने समजावतात. प्रकाशासंबंधी समजावताना सांगतात, मुला! कोणत्या टप्प्यावर कोणता प्रकाश दिसेल, कोणत्या प्रकारचा ध्वनी ऐकू येईल? दहा प्रकारचे ध्वनी या ठिकाणी ऐकू येतात. कोठे वीज चमकते! कोठे प्रकाश दिसतो!

**सुरत निरत की झड़ियाँ लागीं । धुन अनंत शब्दन से चालीं ।।**

आपण प्रेमाने समजावता, ''आपण नामस्मरण करू लागतो, तेव्हा आपले लक्ष नेत्रांच्या पाठीमागे एकाग्र होऊ लागते. आपल्या आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म व कारण अशी तीन आवरणे चढलेली आहेत. सोबत आशा व तृष्णा या दोन शक्त्या आहेत. त्याचप्रमाणे अंतर्यात निरत आणि सुरत या शक्त्या आहेत. पाहू शकणाऱ्या शक्तीस निरत, तर ऐकू शकणाऱ्या शक्तीस सुरत म्हटले जाते.''

महाराजजी सांगत असत,''जोपर्यंत आपण नेत्रांच्या बाहेर (बाह्यजगात) बसलेलो आहोत, तोपर्यंत आपल्या अंतर्यात निरत शक्ती कार्यरत होत नाही. आपण जेव्हा ध्यान-अभ्यासासाठी बसतो, तेव्हा आपणांस अंतर्यात प्रकाश दिसू लागतो, पण त्याचे अस्तित्व थोड्या वेळापुरतेच असते. याचे कारण म्हणजे आपल्या अंतर्यात निरत शक्ती कार्यरत झालेली नसते. ही निरत शक्ती जेव्हा कार्यरत होते, तेव्हा आपल्या सुरतमध्ये अशी शक्ती जागृत होते की ज्यावर आरूढ होऊन आपण सर्व मंडळे पार करू शकतो.''

ध्वनी हे आपले अंतिम ध्येय असून नामस्मरण त्या ध्वनीशी जोडले जाण्यासाठी माध्यम आहे. अंतर्यातील परमार्थिक मार्गाचे सर्व टप्पे आपण ध्वनीच्या मदतीनेच पार करू शकतो; आपण पुढे जाऊ शकतो.

**वृद्ध अवस्था चेतन लागी । काल आय जब सिर पर गाजी ।।**

स्वामीजी महाराजांनी सुरुवातीस नामधारींच्या अवस्थेचे वर्णन करून सांगितले की, कशारितीने तो अंतर्यात जाऊन सतगुरूंची कृपा प्राप्त करून घेतो व त्याच्या अंतसमयी सतगुरू कशातऱ्हेने त्याचा सांभाळ करतात?

आता आपण त्यांच्या बाबतीत माहिती सांगत आहात, ज्यांना सतगुरू तसेच नाम प्राप्त झालेले नाही. हे बिना नामधारी व्यक्ती जेव्हा वृद्ध होतात, तेव्हा त्यांच्या अंतसमयी त्यांना नेण्यासाठी मृत्युदेवता क्षणा-क्षणाने समीप येत असतात. कधी ताप येणे, जुलाब होणे वा इतर प्रकारच्या आजाराने

ग्रस्त होणे हे सर्व मृत्यूचे प्यादे, मृत्यूचे इशारे आहेत, जे बजावतात की, आता तरी तू **प्रभु**–परमेश्वराचे चिंतन कर! त्याचे ध्यान कर. परंतु मनुष्य वृद्ध झाल्यावर या जगाची आशा, तृष्णा निरनिराळ्या इच्छा–आकांक्षा त्यास घेरतात. त्या सर्वांची पूर्ती करण्याची तो धडपड करतो की मी हे सुद्धा करावे आणि ते सुद्धा करावे. अशाने या जगावरील प्रेमाची आणखीन वृत्ती होते. त्यावेळी त्याची अवस्था अशी असते की:

***सब कुछ अपना इक राम पराया।***

**जमपुर से अब सतगुरु राखें । बहुतक जीव मौत दर ताकें ।।**

आता आपण प्रेमाने सांगता, ''तू आता वृद्ध झाला असूनही, **प्रभु**कडे तसेच नामाकडे वळत नाहीस. ज्या शक्तीने आपले रक्षण करावयाचे आहे त्या शक्तीबद्दल तुला अजूनही प्रेमभाव वाटत नाही. ज्याने नाम घेतलेले नाही, सतगुरूंचा पदर पकडलेला नाही, अशा व्यक्तीचे संरक्षण आता कोण करील?'' गुरूसाहेब सांगतात :

***गुरु मंत्रहीणस जो प्राणी, दीर्घन्त जन्म भ्रष्टणे ।***
***कूकर सूकर गर्धव काके खल तुल्हे ।।***

ज्यास नाम प्राप्त झालेले नाही, सतगुरू लाभलेले नाहीत, त्याची तुलना कुत्रा, गाढव, सर्प व कावळ्याशी केली जाते. यापेक्षा अजुन कोणत्या शब्दात महात्म्यांनी आपणांस समजून सांगावे? त्यांनी तर प्रेमाने आपणांस मार्गदर्शक तत्वे वाणींरुपात लिहून ठेवलेली आहेत, पुढे त्या वाणींचा फायदा करून घ्यावा वा घेऊ नये हे आपल्यावर अवलंबून आहे.

स्वामीजी महाराज असेदेखील सांगतात की अंतसमयी अनेक जीव त्यांच्या संरक्षणाच्या अपेक्षेने आजूबाजूला असलेल्या नातेवाईक, मित्रमंडळींकडे पाहतात. परंतु या सर्वांना त्याच्यावर प्रेम असूनही, हे सर्व आत्मा शरीरात असेपर्यंतच त्याची साथ देऊ शकतात आणि मृत्युनंतर जास्तीत जास्त ते रडू शकतात, विलाप करू शकतात. त्या नातेवाईकांना, बहीण–बांधवांना,

मुलांना, मृत्युदेवता कोठून आला व कान पकडून कोठे जीवास घेऊन गेला, याची काडीमात्रही जाणीव नसते, ते आपली काय मदत करू शकतात? अशावेळी जर कोणी मदत करू शकेल, तर ते सतगुरू आहेत नाम आहे. परंतु आयुष्यभर आपण या दोहोंशी गांठ घेतलेली नसते.

**काल घटा जब आकर छाई । धारा मौत अधिक बर्षाई ।।**

ज्याप्रमाणे श्रावण महिन्यात पुष्कळ काळे ढग एकत्र होतात व खूप मुसळदार पाऊस पडतो, त्याचप्रमाणे वृद्धावस्थेत मृत्युदेवता आपणांस चारही बाजूंनी घेरतो व त्याचे शक्तीप्रदर्शन करतो. अशावेळी तो वृद्ध त्याच्या मुलांना सांगतो, ''एखाद्या निष्णात डॉक्टरास घेऊन या, माझा चांगला इलाज करा, ज्यायोगे आणखीन काही काळ मी जिवंत राहू शकेन.'' परंतु आपणांस कल्पना आहे की, मृत्युची वेळ झाल्यावर मृत्युदेव कोणाची वाट पाहतो का? कोणास सूट देतो का? तुझी सर्व कामे आटोपून घे, मगच मी तुला नेण्यासाठी येईन, असे तो कधी म्हणतो का? आपणांस कल्पनाही नसते की, कधी तो येईल व आपली मान दाबेल. वर घेतलेला श्वास वरच तर खाली सोडलेला श्वास खालीच रहातो.

**जीव अनेक रहे घबराई । काया गढ़ उन दीन्ह ढवाई ।।**

आपण प्रेमाने सांगता की, त्यावेळी केवळ मृत्युचे नाव घेतल्यावरही जीव घाबराघुबरा होतो. तो म्हणतो, मृत्युच्या गोष्टी माझ्याजवळ करू नका. परंतु मृत्युदेवता मात्र त्याच्या शरीराचा ताबा घेतो, आत्म्यास स्वतःच्या ताब्यात घेऊन निघून जातो.

माझ्यादेखत घडलेली घटना आहे की, आमच्या गावातील एका माणसाने खूप सुंदर घर बांधले. घर बांधून पूर्ण झाल्यावर, त्या घरात त्या मनुष्याने व्यवस्थित राहाण्यास सुरुवात केली न केली तोच त्याच्यासमोर मृत्युदेवता हजर झाला. तो मनुष्य मृत्युदेवतेस म्हणू लागला,''हे बघ बंधु! मी नुकतेच नवीन घर बांधले असून, मला त्यामध्ये व्यवस्थित रहू दे. आमच्या गांवामध्ये

एक भंगी आहे, त्यास राहाण्यासाठी धड घर देखील नाही. तू त्यास घेऊन जा.'' परंतु मृत्यु कधी कोणाची वाट पाहतो? माझ्यादेखत घडलेली ही घटना आहे. मी त्यावेळी वैद्य होतो व त्या मनुष्यास औषध-पाणी देत असे.

**जमपुर जाय जीव पछतावें । जम के दूत तिन बहुत सतावें ।।**

आपणांस कल्पना आहे की, जेव्हा चोर-बदमाषांना पोलीस पकडतात व त्यांना चौकीमध्ये नेऊन मारहाण करतात. त्यावेळी ते चोर-बदमाष वेदनेने किंचाळतात व पस्तावतात. परंतु त्यावेळी त्यांच्या किंचाळ्या व विनवण्या कोण ऐकतो? कोण त्यांना सहानुभूती दर्शवतो? तेथे एखादा वरिष्ठ पोलीस अधिकारी जरी आला, तरी तो देखील सांगतो की, यांना आणखीन मारा! कदाचित यांच्याकडे आणखीन चोरीचा ऐवज असू शकेल. प्रियजनहो! नंतर पस्तावण्यामध्ये काय अर्थ आहे? तेथे याची विनवणी कोण ऐकेल? कोण याच्यावर दया करेल?

**नाना कष्ट दे हैं पल-पल में । फिर फाँसी डालें गल गल में ।।**

आपण सांगत आहात, ''आत्म्यास ज्या काही यातना दिल्या जातात, त्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही. ज्याप्रमाणे या जगात गुन्हेगारांना फाशी दिली जाते, त्याचप्रमाणे फसवणूक, विश्वासघात करणाऱ्यांना काळदेखील अशीच शिक्षा देतो.'' मी नाभा येथे सैन्यात असताना, शेजारीच तुरुंग होते. कैद्यांची वाईट अवस्था, त्यांचा आरडाओरड आम्ही डोळ्यांनी पाहायचो, कानांनी ऐकायचो. परंतु तेथे त्यांच्याप्रती कोण सहानुभूती दर्शवणार?

**कुम्भी नर्क माहिं दें गोते । जीव सहें दुख अति कर रोते ।।**

आपण सांगता,''सजा दिल्यानंतरदेखील कोठे आत्म्याची सुटका होते? पुढे कुंभाच्या आकाराचे घडे घाण व विष्टेने भरलेले असतात. त्या घड्यांमध्ये आत्म्यांना टाकले जाते. येथे कोण त्यांच्या किंचाळ्या व विनवण्या ऐकतो वा त्यांच्यावर दया करतो?'' तुम्ही या जगातदेखील पाहता की जो कट्टर गुन्हेगार असतो त्यास घाणेरड्या जागेत, ते सुद्धा बेड्यांनी जखडून ठेवतात.

त्याची त्या बेड्यांपासून सुटका ना जागेपणी ना निद्रावस्थेत होते. जर या जगातील कायदे अशा गुन्हेगारांना माफ करीत नाही, तर अंतर्यात त्यांची सुटका कशी बरे होईल? कारण अंतर्यातील वास्तवाचीच बाहेरील जगामध्ये नक्कल केलेली आहे. तुम्ही गरूड पुराण, नासिकेत पुराण वाचून पाहा! नरकामध्ये जीवांना किती यातना सहन कराव्या लागतात? महात्म्यांनी ग्रंथात या गोष्टी आपणांस भीती घालण्यास लिहिलेल्या नाहीत. त्यांनी सत्य पाहिलेले आहे व त्याचे वर्णन करीत आपणांस ते समजावतात की तुम्ही स्वत:चा बचाव करा, जीवनास व्यर्थ गमावू नका.

**वे निरदई दया नहिं लावें । अति त्रास से जिव मुरझावें ।।**

आपण सांगता, मृत्युदेवतांच्या अंतरात जीवांप्रती जरासुद्धा करुणा नसते, ते निर्दयी असतात. एक आत्मा दुसऱ्या आत्म्यास दिल्या जाणाऱ्या वेदना पाहून दु:खी होतो, पस्तावतो. यास यातना देण्याचे तर अजून बाकीच असते. माझ्या नजरे समोरील घटना आहे. मी जेव्हा प्रथमच अमेरिकेला जाणार होतो, तेव्हा त्या प्रवासापूर्वी दिल्लीत मला लसीचे इंजेक्शन घ्यावयाचे होते. माझ्यासोबत पप्पु व त्याचे वडिलदेखील होते. दुसऱ्या एका व्यक्तीस लसीचे इंजेक्शन देताना पाहून भीतीने पप्पुचा चेहरा पिवळा पडला. तेव्हा पप्पुचे वडिल त्यास म्हणाले, ''अरे! तू का घाबरतोस, तू तर सैनिकाचा मुलगा आहेस.'' मी पप्पुस म्हणालो, ''तू अमेरिकेस एका सैनिका सोबतच जात आहेस.'' एखाद्या व्यक्तीस इंजेक्शन देताना पाहून आपण जर इतके भयभीत होत असू की आपला रंगच बदलतो, तर अंतर्यात जीवास दिल्या जाणाऱ्या भीषण यातना व वेदना पाहून आपली काय अवस्था होत असेल?

**अगिन खंभ से फिर लिपटावें । हाय हाय कर तब चिल्लावें ।।**

आपण प्रेमाने पुढे सांगता, ''तेथे कोण त्या जीवांना माफ करणार? ज्यांनी स्वत:चे चारित्र्य निर्मळ ठेवलेले नसते, त्यांना तेथे तप्त खांबांना मिठी मारण्यास भाग पाडले जाते. त्यावेळी होणाऱ्या वेदनांमुळे जीव हाय! हाय!

करतो, खूप आरडाओरडा करतो, परंतु त्याने दिलेली हाक व केलेल्या विनवण्या कोणीही ऐकत नाही. होणाऱ्या वेदनांमुळे तो त्या खांबा दूर जातो, परंतु पुन्हा त्या तप्त खांबास त्या जीवास चिकटविले जाते.

महाराज सावन सिंहजी कधी कधी सत्संगात वर्णन करीत असत की, अंतर्यात काळाने मोठमोठे उष्ण खांब ठेवले आहेत. मलिन आत्म्यांना त्या तप्त खांबांशी चिकटविले जाते. त्या उष्ण खांबांची एखादी ठिणगी जरी या जगात पडली, तर हे जग भस्मसात होईल. त्यामुळे अंतर्यात गेल्यावर आत्मा भयभीत होतो. जे आत्मे मनुष्य जन्मास येऊनही परमात्म्याची भक्ती करीत नाहीत, नामाची भक्ती करीत नाहीत, बेपर्वाईने जीवन व्यर्थ गमावतात की कोणा गुरू-पीराकडे जाण्याची, नामस्मरण करण्याची काहीच गरज नाही, त्यांना तेथे त्रास सहन करावा लागतो.

**सुने न कोई मुश्किल भारी । सर्पन माला ले गल डारी ।।**

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''तेथे आत्म्याची अतिशय कष्टप्रद अवस्था असते, तेथे कोणीही आत्म्याच्या वेदनास्पद किंकाळ्या व विनवण्या ऐकत नाही. तप्त खांबांना मिठ्या मारल्यानंतरही त्यास मुक्त केले जात नाही. त्याच्या गळ्यात सर्पांच्या माळा घातल्या जातात, जे साप त्यास डंक मारीत त्याचे लचके तोडून खातात. यासंसारात एखादा साप जरी आपल्या दृष्टीस पडला, तर आपण जीव वाचविण्यास तेथून पळ काढतो. जर कोणी आपल्या गळ्यात अनेक सर्पांची माळ घातल्यास आपली काय अवस्था होईल? परंतु मनुष्य जन्मामध्ये जर बेपर्वाई केली, ध्यान-अभ्यास केला नाही, तर त्याच्या विनवणीकडे कोण लक्ष देईल? खरेतर विनवणी सतगुरूंनी जरूर ऐकली असती. परंतु जीव सतगुरूंकडे गेला नाही, त्यांच्या कडून नाम प्राप्त करून घेतले नाही.

**मार-मार चहुं दिस से होई । पति गति अपनी सब विधि खोई ।।**

**नर्कन में अति त्रास दिखावें । फिर चौरासी ले पहुंचावें ।।**

महात्मा आपणांस प्रेमाने सांगत आहेत की, सुरुवातीला आत्मा वृक्ष–वनस्पतीच्या योनीत येतो. वृक्ष योनीत बराच काळ रहावे लागते. वृक्षांचे आयुष्यमान खूप दिर्घ असते. त्यानंतर आत्मा किडे–पाखरांचा जन्म घेतो, नंतर सर्प योनीत जातो.

सर्पाची योनी अत्यंत कष्टप्रद असते तसेच त्यांचे आयुष्यातही दिर्घकाल असते. सर्पांच्या शरीरात विष असते जे अतिशय उष्णता निर्माण करत करत सापास आतून भाजून टाकते. त्यानंतर आत्म्यास चतुष्पाद (चार पायांच्या) जनावरांचा जन्म मिळतो. तेथेही त्यास बराच काळ राहावे लागते.

प्रियजनहो, चाऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये भ्रमण करुन झाल्यानंतर जेव्हा त्याच्या मनुष्यजन्माची वेळ येते, तेव्हा तो बेपर्वाई करत तो जन्म वाया घालवतो. आपण जर प्रत्येक जन्माचा कालावधी काही ठराविक सरासरी वर्षांच्या अंदाजाने मोजला, तरी मनुष्य जन्मापर्यंत पोहोचण्यासाठी जीवास करोडो युग लागतात. आपणांस चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये भ्रमण का करावे लागले? **प्रभु**–परमात्म्याने आपणांस दिलेल्या मौल्यवान मनुष्यजन्माचे बक्षीस आपण वाया घालविले, त्यापासून आपण फायदा करून घेतला नाही, गुरुभक्ती केली नाही, शब्द नामाची कमाई केली नाही. म्हणून गुरू नानक देवजी महाराज म्हणतात :

***लख चौरासी जून सवाई, मानस को प्रभ दी वडियाई ।***
***इस पौड़ी ते जो नर चूके, सो आए जाए दुख पाऐंदा ।।***

## गुरू भक्ती बिन यह गति पाई । नर देही सब बाद गँवाई ।।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''आत्म्यास नरकात का जावे लागले? निरनिराळ्या योनींत जाऊन हालअपेष्टा का सहन कराव्या लागल्या? कारण त्याने गुरू धारण केले नाहीत, शब्दनाम प्राप्त करून घेतले नाही, म्हणूनच त्यास इतके कष्ट व यातना सहन कराव्या लागल्या. कारण या ठिकाणी आपले रक्षण केवळ सतगुरूच करू शकतात.

तुम्ही शांत चित्ताने विचार करा! महात्मा स्वत:चे ओझे कोणा एका व्यक्तीवर वा समाजावर टाकीत नाहीत. त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येते की, ते शेती, दुकानदारी वा नोकरी करून स्वत:चा उदरनिर्वाह करतात व संगतची सेवा ते मोफत करतात. महात्मा आपल्याकडून काहीच मागत नाहीत, सेवकाकडून कसलीही अपेक्षा ठेवत नाहीत. प्रियजनहो! आपणांस असा मोफत नोकर मिळाल्यावरही त्याच्याद्वारे जर आपण कसलाच फायदा करून घेतला नाही, तर आपले केवढे मोठे दुर्भाग्य आहे?

महाराज सावन सिंहजी एक खूप सुंदर उदाहरण देऊन समाजावत असत,''एक शेतकरी काही खरेदी करण्यासाठी एका दुकानात गेला. त्याने खरेदी केली परंतु त्याच्याकडून पैसे घेण्याचे दुकानदार विसरला. तो शेतकरी पैसे न देता खरेदी केलेली वस्तू घेऊन चालला होता व सोबत मनातून त्या दुकानदारास शिव्या सुद्धा देत होता की, मी केलेल्या खरेदीमधून त्या दुकानदाराने कितीतरी पैसे कमावले असतील. आपली अवस्थादेखील त्या शेतकऱ्याप्रमाणेच आहे. आपण विचार करतो!अशी मोफत सेवा करणे कोणास शक्य आहे का? परंतु परमार्थात जे महात्मा परमात्म्याकडून आलेले असतात, ते कोणत्याही मोबदल्याशिवाय आत्म्याची सेवा करतात.''

आपले सतगुरू महाराज कृपाल म्हणत असत,''संतमहात्मा, ते देत असलेल्या शिकवणुकीची कोणाकडून मोबदला घेत नाहीत. जसे प्रत्येकास हवा, पाणी व प्रकाश मोफत देणे हा निसर्गाचा नियम आहे, त्याचप्रमाणे महात्मादेखील या जगात येऊन त्यांचा कृपावर्षाव मोफतच करतात.

**जो जो भजन भक्ती से चूके। तिन के मुख जम पल पल थूके ।।**

स्वामीजी महाराज सांगतात, ज्यांनी मनुष्य जन्मास येऊनही गुरू भक्ती, नाम-भक्ती केली नाही, त्यांच्या तोंडावर क्षणोक्षणी यम थुंकतो. तो त्यांना म्हणतो,''तुझे मुख पाहाण्यालायक नाही, ते केवळ थुंकण्यालायकच आहे. तू येथे का आलास?'' गुरू नानक यापेक्षाही कठोर शब्दांत म्हणतात:

***नाम हीन नकटे नर देखे, तिन घस घस नाक वडीजे ।***

प्रियजनहो! ज्यांना सतगुरूंद्वारे नाम मिळत नाही, काळ त्यांचे नाक कापून टाकतो. ते नकटे झाल्याने कुरूप दिसतात.

**ऐसी कुगति होयगी सब की । जो नहिं धारें सतगुरु अब की ।।**

स्वामीजी महाराज सांगतात की,''माझा उपदेश कोणा खास जाती–धर्मासाठी नाही. आपण हिंदू, शिख वा ख्रिश्चन कोणीही असो, जर आपण परमात्म्याची भक्ती, नामभक्ती केली नाही, तर आपली सर्वांची अधोगती होईल. यमदूत कोणाची पर्वा करीत नाहीत. इतर योनींमध्ये प्रभु–परमात्म्याची भक्ती केली जाऊ शकत नाही. म्हणून तो आपणांस मनुष्यजन्म बहाल करतो की, माझी भक्ती करून तू माझ्याशी एकरूप हो. सतगुरू आपणांस नाम देतात, परंतु आपण त्या नामाची कदर करीत नाही.

**सतगुरू बिना कोई नेहिं बाचे । नाम बिना चौरासी नाचे ।।**

आपण पुढे सांगता, ''या भवसागरामधून सतगुरूंच्या मदतीशिवाय आतापर्यंत कोणीही तरला नाही व तरूही शकणार नाही. नामाशिवाय आत्म्यास चौऱ्याऐंशी लक्ष योनींमध्ये नक्कीच जावे लागते.'' गुरू नानक देवजी महाराज म्हणतात :

***नाम विसार चले अन्मार्ग अन्त काल पछताई है ।***

नामस्मरण करण्याचे सोडून, शब्द–धुनचा अभ्यास करण्याचे सोडून, आपण इतर कितीही श्रेष्ठ मार्गावर चालत असलो, तरीही आपणांस अंतसमयी पस्तवावे लागेल. गुरू अर्जुन देवजी महाराज म्हणतात :

***कर्म धर्म पाखंड जो दिसे तिस जम जोगाति लूटे ।***
***निर्वाण कीर्तन गाओ हर करते का निमख सिमृत जित छूटे ।***
***कोट तीर्थ मजन स्नाने इस कल में मैल भरीजे ।***
***साध संग जो हर गुण गावे सो निर्मल कर लीजे ।।***

**धन्य भाग हम सतगुरु पाया । चढ़ी सुरत मन गगन समाया ।।**

आता आपण प्रेमाने सांगता,''आपले अतिशय उच्च भाग्य होते, परमात्म्याने आपणांवर खूप कृपा केली की, ज्यायोगे आपल्या सत्कर्मांचे बक्षीस म्हणून आपली सतगुरूंशी भेट करविली; आपणांस नाम प्राप्त झाले. सतगुरूंच्या कृपेने आपण आपल्या मन इंद्रियांच्या पातळीवरून वर येऊन आकाशामध्ये म्हणजेच दोन्ही नेत्रांच्या पाठच्या बाजूस, तिसऱ्या तिळावरूनही वर पोहोचलो. जे आत्मा येथे पोहोचतात, त्यांनाच अनुभव येतो की शांती म्हणजे काय? सतगुरू कोण असतात? नाम शक्ती किती प्रबळ असते?

**सुन्न मंडल जाय झूला झूली । सावन मास लिया फल मूली ।।**

ज्याप्रमाणे श्रावण महिन्यामध्ये लोक झोपाळ्यावर झोके घेत आनंद लुटतात, त्याचप्रमाणे स्थूल, सूक्ष्म व कारण ही तिन्ही आवरणे दूर सारून आत्मा दशमद्वारी पोहोचतो, तेव्हा तेथे पोहोचल्यावर त्यास आकलन होते की, त्याचादेखील परमात्मा आहे. तेथे लिंगभेद नाहीसा होतो. तेथे आत्मा ना स्त्री ना पुरुष, ना कृष्ण ना श्वेतवर्णीय; ना अमेरिकावासी ना हिंदुस्थानवासी असतो. तो केवळ आत्मा असतो. या मृत्युलोकात येऊन आत्म्याने तिन्ही आवरणांखाली स्वत:चे तेज गमावलेले असते.

**सखियाँ सब मिल गावन लागीं । माय ममता देखत भागीं ।।**

आपण प्रेमाने सांगत आहात, ''महात्म्यांचे आत्मा तेथे पोहोचून **प्रभु**-परमात्म्याचे गुणगान करीत असतात, तेथेच त्यांनी नाम दिलेले आत्मादेखील जाऊन **प्रभु**परमात्म्याचे गुणगान करू लागतात. तेथे माया मंडळांची शक्ती संपून जाते, तेथे केवळ निर्मळ पवित्र आत्मे असतात.''

**सभी सुहागन झूलें घर घर । पिया अपने को हिरदे धर धर ।।**

विवाह झालेल्या मुली श्रावण महिन्यामध्ये झोपाळ्यांवर झोके घेतात, तसेच आपल्या पतीचरणी राहून आनंद उपभोगतात. ज्या मुलींचा पती निधन पावलेला असतो अथवा परदेशी गेलेला असतो, त्या मुली मात्र



अशावेळी खूप दु:खी होतात. ज्या सद्गुणी स्त्रियांचे पती त्यांच्या ऐन तारुण्यामध्ये दुरावतात, त्या स्त्रियांना पती विरहामुळे होणाऱ्या वेदनांची मला जाणीव आहे.

मी जेव्हा कोलंबिया येथे गेलो होतो, त्यावेळी काही अमेरिकेतील नागरीकांना ईराणमध्ये बंदी करून ठेवले होते. त्या बंदी लोकांमध्ये असलेल्या एका व्यक्तीची पत्नी, खूप पैसे खर्च करून विमानाने दूरचा प्रवास करून उत्तर अमेरिकेतून दक्षिण अमेरिकेमध्ये मला भेटावयास आली. अतिशय भावूक होऊन तिने मला विचारले, ''मी तुमचे महात्म्य ऐकून येथे आलेली आहे. तुम्ही माझ्यावर कृपा करून सांगा की माझ्या पतीशी माझी भेट होईल का? माझा पती जिवंत आहे का? तो जिवंत माझ्याजवळ येईल का?'' ही आहे एक या जगातील घटना, परंतु आपल्या हृदयामध्ये कधी असा विचार आला का की माझ्यापासून माझा परमात्मारूपी पती किती युगायुगांपासून दुरावला आहे? आपल्या हृदयामध्ये त्याची कधी आठवण आली? त्याच्या विरहामध्ये कधी तळमळलो? रात्री कधी जागरण केले की आपल्या पतीचा विरह झाला असून आपली किती विपन्न अवस्था आहे?

**पिया बिमुख तरसें बहुत नारी । जिनके पति परदेश सिधारी ।।**
**तिनको सावन काला नागा । डस डस खावे लागे आगा ।।**

आपण पुढे सांगता, ''ज्या स्त्रियांचे पती परदेशी गेले आहेत अथवा मरण पावले आहेत, त्या स्त्रियांना श्रावणाच्या महिन्यामध्ये सर्पदंशाप्रमाणे वेदना होतात. त्यांना कोणताही सणाचा आनंद वाटत नाही, क्षणाक्षणाला पती विरहाच्या वेदना त्यांच्या हृदयामध्ये होत असतात.''

प्रियजनहो! ज्यांना जीवनात सतगुरू भेटतात,नाम प्राप्त होते, त्यांनी ध्यान–अभ्यास करून जर त्यांच्या अंतर्यात सतगुरूंना प्रगट करून घेतले असेल, तर त्यांनाच मनुष्यजन्माचे चीज करून घेतल्याचा आनंद लाभतो.

**बाहर वर्षा रिमझिम होई । घट में उनके अग्नि समोई ।।**

बाहेर जरी पावसाचा वर्षाव होत असेल, तरी त्यांच्या अंतर्यात अग्नी धगधगत असतो. आजकाल धर्म प्रचारक मंडळींची हीच अवस्था आहे की स्वत:च्या घरास आग लागलेली असून, ही मंडळी इतरांच्या घरांची आग विझविण्यासाठी पाण्याच्या बादल्या घेऊन फिरत असतात. लोकांवर परोपकार करण्याचा विचार करतात की लोकांनी अमुक प्रकारे भक्ती करावी, कर्म–धर्म करावा, परंतु त्यांचे स्वत:चे हृदय मात्र काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकाराने बरबटलेले असते. गुरू नानकदेवजी महाराज म्हणतात:

***पहले मन परबोधे आपणा पीछे अवर रिझावे ।***

सर्वप्रथम त्यांनी स्वत:च्या अंतर्यात शांतीचा लाभ करून घ्यावयास हवा होता. त्यानंतर जर त्यांनी लोकांवर परोपकार केला असता, तर ते आणखीन चांगले झाले असते.

**अग्नि लगी मानो तन मन फूँका । उनके भावें पड़ गया गया सूखा ।।**
**तीज त्योहार कछू नहिं भावे । मन में दुख, नहिं हर्ष समावे ।।**
**पिया बिन सावन कैसा आया । जेठ तपन जस जीव जलाया ।।**

**दोहा**

**जीव जले विरह अग्नि में, क्योंकर शीतल होय ।**
**बिन वर्षा पिया बचन के, गई तरावत खोय ।।**
**जिन को कंत मिलाप है, तिन मुख बरसत नूर ।।**
**घट सीतल हिरदा सुखी, बाजे अनहद तूर ।।**

***



# गुरुस्वरुपास अंतर्यात कसे प्रगट करावे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे
संत बानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – ३० डिसेंबर १९९०

**एक प्रेमी:** जेव्हा एखादा सेवक ध्यान–अभ्यासाद्वारे अंतर्यात जाऊन गुरू स्वरूपापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत असला, परंतु तो गुरू स्वरूपापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाला नसेल, तर केवळ तो अंतर्यात ध्वनी ऐकू शकतो वा नामस्मरण करू शकतो, अशा परिस्थितीत त्या सेवकाने अंतर्यात गुरु स्वरुपाचे ध्यान केले पाहिजे की त्याने आपले ध्यान अभ्यासाचे काम करीत राहून असे समजले पाहिजे की त्याची ध्यान–अभ्यासात पुरेशी उन्नती झाली नसल्याने सतगुरुंनी अद्यापी त्यास अंतर्यात आपले दर्शन देण्यायोग्य समजलेले नाही?

**बाबाजी:** हा प्रश्न प्रत्येक सत्संगीसाठी खूप उपयोगी आहे. सर्वप्रथम जेव्हा एखादा सेवक ध्यान–अभ्यासात परिश्रम घेतो, तेव्हा त्या सेवकाच्या अंतर्यात सतगुरूंप्रती प्रेम आपोआप निर्माण होते. परिश्रम हा अंतर्यात प्रेम निर्माण करण्याचा एक मार्ग आहे. जेव्हा प्रेमीच्या अंतर्यात गुरूप्रेम निर्माण होते तेव्हा त्यास ध्यान–अभ्यास करणे हे ओझे वाटत नाही, खरेतर अशा वेळी त्यास वेळेचेही भान राहत नाही. प्रेमीस असे वाटत नाही की आपणांस या परिश्रमाचा काही मोबदला मिळाला तरच मी ते काम करेन.

ज्याप्रमाणे वादळी पावसाचे पाणी ओढ्यातून अत्यंत वेगाने वहात असते, त्याप्रमाणे प्रेमीच्या अंतर्यात सतगुरूंचे प्रेम जबरदस्त आकर्षण निर्माण करते. ही प्रेमाची लाट असते. प्रेम ही एक अत्यंत आकर्षक शक्ती आहे. जर सांसारीक पातळीवर एखाद्या व्यक्तीबद्दल आपणांस प्रेम व आपुलकी असली तर त्या व्यक्तीची आठवण येताच त्याचा संपूर्ण आकार, उंची, श्वेत वा कृष्ण वर्ण, सर्वकाही आपल्या नजरेसमोर उभे राहते.

शब्द–ध्वनीने सर्व विश्वास व्यापलेले आहे. परमात्मा किड्याची प्रार्थना अगोदर ऐकतो व हत्तीची गर्जनात्मक प्रार्थना नंतर ऐकतो. सत्य हे आहे की, आपण विचार नंतर करतो, त्यास तो अगोदरच ऐकतो. परमात्मा आपल्या अंतर्यात वास करीत असल्याने तो आपणांस उत्तर देखील देतो. परंतु त्याचे उत्तर ऐकण्यासाठी आपण उच्च पातळीवर म्हणजेच त्याच्या पातळीपर्यंत पोहचू न शकल्याने त्याने दिलेले उत्तर आपण ऐकू शकत नाही.

महाराज सावन सिंहजी शब्दधुन ऐकण्याच्या ध्यानावर खूप जोर देत असत, परंतु महाराज कृपालजी तेवढे आग्रही नसत. प्रत्येक संतांची त्यांच्या शिष्यांना समजावण्याची आपापली पद्धत असते. ते नेहमी सांगत असत की, आपण नामस्मरणाच्या मदतीने आपल्या शरीराची नऊ द्वारे रिक्त करावी. आपण जेव्हा नऊ द्वारे रिक्त करुन दोन्ही नेत्रांमागे येतो, तेव्हा आपणांस ध्यान–एकाग्रतेची आवश्यकता असते. कारण आपले लक्ष वर येते–खाली जाते. ध्यान–एकाग्रतेशिवाय आपले लक्ष तेथे स्थिर होऊ शकत नाही.

यासंदर्भात महाराज सावन सिंहजी सांगत असत की, आपण सत्संगामध्ये बसलेले असतानाही सतगुरूंच्या स्वरूपाकडे पाहत ध्यान एकाग्रतेची सवय करून घेऊ शकतो. आपण चालता–फिरता नामस्मरण करीत असताना, आपल्या नेत्रांसमोर सतगुरू स्वरूप आणू शकतो. आपल्यामध्ये असलेल्या एकाग्रतेच्या अभावाची पूर्ती जर आपण फक्त ध्यान–अभ्यास करताना करू असे म्हटले, तर तसे होऊ शकणार नाही. तो एकाग्रतेचा अभाव अगोदरच पूर्ण होऊ शकतो. सत्संगाद्वारे तसेच चालता–फिरताना नामस्मरण करीत जर आपली एकाग्रता पक्की झाली, तर ध्यान–अभ्यासासाठी घुडगे आखडेपर्यंत बसून आपली एकाग्रता होण्याची वाट पाहावी लागत नाही. कारण त्यापूर्वीच आपणांस एकाग्रतेची सवय जडलेली असते.

मी माझ्यासमोर घडलेली घटना सांगतो. जेव्हा कधी महाराज सावन सिंहजी कृपा करून सेवा करणाऱ्या शिष्यांना ते स्वत:च्या हातांनी चपाती देत असत. त्यावेळी ते प्रेमी भलेही त्यांच्या हातांनी चपाती घेत, परंतु त्यांचे

लक्ष मात्र महाराजजींच्या दोन्ही भुवयांच्या दरम्यान (कपाळावर) असे. तुम्ही नवीन भजनामध्ये वाचता:

***लक्खां शक्लां तक्कियां अक्खियां ने, कोई नजर मेरी विच खुबदी ना ।***



हे सावन! मी अनेक चेहरे पाहिले, परंतु माझ्या नेत्रांना एकही चेहरा भावला नाही. मात्र तुमची नजर, तुमचा चेहरा काही माझ्या नेत्रांसमोरून हटला नाही. मी महाराजजींच्या संगत मध्ये अनेक सेवकांना असे करताना पाहिले आहे, तसेच मीदेखील तसे करण्याचा अभ्यास केलेला आहे की, जेव्हा सत्संग चालू असेल तेव्हा मागील बाजूस कसलाही व कितीही आवाज होवो, सत्संगी मागे वळून पाहत नसत. त्यांची एकाग्रता तर एवढी पक्की झाली होती की पाठीजी कोणता पाठ वाचत आहेत अथवा महाराजजी इतर कोणाशी तरी बोलत आहेत, यांवर त्यांचे बिल्कूल लक्ष नसे. सत्संगीचे लक्ष महाराजजींच्या पवित्र चेहऱ्यांवर एकाग्र झालेले असायचे. साधारणपणे सत्संगी, सत्संग झाल्यावर इतरांशी बोलत नसत. एकतर ते शांतपणे घरी निघून जात असत अथवा तेथे बसून नामस्मरण करीत असत किंवा महाराजजींचे स्वरूप नजरेसमोर आणून एकाग्रता करण्याचा अभ्यास करीत असत. तुम्हीच पहा! ज्यांचे अशाप्रकारे लक्ष (ध्यान) एकाग्र होते, त्यांना बसून लक्ष एकाग्र करण्याची काय गरज? निद्रित वा जागृत, कोणत्याही अवस्थेत महाराजजींचा चेहरा त्यांच्या नजरेसमोर असतो. चालत असताना देखील त्यांना वाटत असे की तो चेहरा त्यांच्या सोबतच चालत आहे.

महाराज कृपाल सिंहजी देत असलेला इशारा आपण समजू शकलो नाही, ते ध्यान–अभ्यास करण्याचा आग्रह करीत नसत, याचा अर्थ आपण ध्यान–अभ्यास करू नये असा नव्हता. ते म्हणत, 'खुदा तोच आहे, जो खुद्द (स्वत:) येईल.' असे म्हणण्यामागे त्यांचा हा हेतु होता की आपण जेव्हा प्रेमपूर्वक नामस्मरण करू, तेव्हा मनाच्या आपोआप लक्षात येईल की आपण किती महान संतांनी दिलेल्या नामाचे स्मरण करीत आहोत. त्यामुळे सतगुरूंचे स्वरूप आपोआपच आपल्या नेत्रांसमोर येईल.

सुरवाती–सुरवातीला आपल्या नेत्रांसमोर गुरूस्वरूप आणून टिकविण्यास आपणांस अवघड जाते. आपल्यासमोर कधी सतगुरूंचा फोटो येतो तर कधी नेत्र येतात, कधी पूर्ण शरीर तर कधी शरीराचा काही भाग आपल्या नजरे समोर येतो. सतगुरूंचे स्वरूप नजरे समोर येऊन लगेच निघून गेले असेही कधी वाटते. परंतु सतगुरू स्वरूप तेथेच, नजरेसमोरच उपस्थित असते. ते कधीच ये–जा करीत नाही. खरेतर सेवकाचे लक्ष अजून त्या ठिकाणी स्थिर झालेले नसते. परंतु थोडाफार संघर्ष केल्यास ध्यान–अभ्यास करण्याची आपणांस सवय जडते व आपण त्यात नैपुण्य प्राप्त करतो. त्यानंतर मात्र संघर्ष करावा लागत नाही. आपले लक्ष आपोआपच एकाग्र होऊ लागते.परंतु बरेच प्रेमी दररोज सातत्याने ध्यान–अभ्यास करीत नाहीत. ते प्रेमी जेव्हा ध्यान–अभ्यासासाठी बसतात तेव्हा त्यांना अंतर्यात शांती प्राप्त होते. थोडीफार अंतर्यात त्यांची उन्नती होते. परंतु लगेच त्यांचे लक्ष कधी सतगुरूस्वरूपाच्या ध्यानाकडे तर कधी नामस्मरणाकडे जाते, ते त्या ओढाताणीतच राहतात.

मी सांगत असतो, 'ध्यान–अभ्यासासाठी बसण्यापूर्वी पाच पवित्र नामांचे मनन करा. त्यावेळी तुमच्या आपोआप लक्षात येईल की तुम्ही कोणी दिलेल्या नामाचे स्मरण करीत आहात! म्हणजेच तुम्हास नामदान देणाऱ्या सतगुरूंचे स्वरूप आपोआप तुमच्या नजरेसमोर येईल. ते स्वरूप तिसऱ्या तीळापासून सचखंडापर्यंत तुमच्या सोबत जाईल.' गुरू नानकदेवजी सांगतात:

***अकाल मूर्त है साध संतन की ठहरने की ध्यान को ।***

एकदा महाराज कृपाल त्यांच्या सतगुरूंची (महाराज सावन सिंहजींची) सेवा करीत होते, तेव्हा त्यांनी महाराजजींना विचारले,''महाराजजी अंतर्यात आपण जे काही पाहतो व बाह्य जगात जे काही आपणांस दिसते, त्यामध्ये काय फरक आहे?'' महाराज सावन हसून म्हणाले,''कृपाल सिहं! तू जे काही येथे पाहत आहेस, तेच अंतर्यात पाहशील. हे स्थूल शरीर आपणांस येथेच सोडून जावे लागेल व अंतर्यात शब्दध्वनी आपल्याबरोबर असतो. खरेतर संत देहधारी शब्दध्वनीच असतात.'' गुरू अर्जुनदेवजी सांगत आहेत:

***रूप न रेख रंग ठाकुर अविनाश ।***
***सो स्वरूप संतन कथे विरले योगिश्वर ।***
***कर कृपा जाको मेले धन धन ते ईश्वर ।।***

परमात्म्याचे कोणतेही स्वरूप वा आकार नसतो. त्याचे कोणी भाऊबंद नाहीत व कोणी पातीदार वा निकट व्यक्ती नाहीत. तो सर्व विश्व व्यापक आहे. जेव्हा आपण वेद-शास्त्रांमधील कथा ऐकल्या, तेव्हा हृदयात अविनाशी परमात्म्यास भेटण्याची तळमळ निर्माण झाली. परंतु कथाकारांनी जेव्हा सांगितले की, परमात्म्याचे कोणतेही स्वरूप नाही, तो अविनाशी आहे, तेव्हा हृदय उदास झाले.

परमात्म्याच्या स्वरूपाचे वर्णन केवळ संतच करू शकतात. संतांचे देह-धारण करण्याचे कारणदेखील हेच असते की आपण जीवांना जन्म-जन्मांतरापासून स्वरूपाचे ध्यान करण्याची सवय जडलेली आहे. या जगाचे ध्यान आपणांस वारंवार येथे आणते. संत जाणतात की, पाण्याशिवाय करपू जात असलेले शेत पाणी दिल्यानेच हिरवेगार होऊ शकते.

आपण करीत असलेले या जागच्या स्मरणाचे विस्मरण व्हावे म्हणून त्यांनी स्वत: कमावलेले नाम ते आपणांस देतात, ज्याच्या पाठीमागे त्यांची तपश्चर्या व त्यांचा त्याग कार्यरत असतो. आपण जेव्हा या जगाच्या स्मरणाचा त्याग करून संत-सतगुरूंनी दिलेल्या नामाचे स्मरण करू लागतो, प्रेमाने

त्यांच्या स्वरूपाचे ध्यान करू लागतो, तेव्हा या जगाचे आपणांस विस्मरण होते. तसेच अंतर्यात एकाग्र होण्याची सवयदेखील आपणांस जडते.

आता बाकी राहिले की आपणांस ध्वनी तर ऐकू येतो परंतु गुरूस्वरूप अंतर्यात प्रगट होत नाही! त्या प्रेमींमध्ये नामस्मरणांची कमतरता असते.



असे प्रेमी ध्वनी ऐकण्यावर भर देतात, परंतु नामस्मरणावर विशेष लक्ष देत नाहीत. ऐकू शकणारी शक्ती सूरत आहे तर पाहू शकणारी शक्ती निरत आहे. प्रेमींनी जर शरीराची नऊ द्वारे त्यागून नामस्मरणावर अधिक भर दिला तर निरत शक्ती जागृत होईल. या ठिकाणी पोहोचल्यावर अनेकदा सेवक उदास देखील होतो की त्यास ध्वनी तर मोठ्याप्रमाणात ऐकू येतो, परंतु सतगुरू स्वरूप मात्र प्रगट होत नाही. याचे कारण म्हणजे आपले नामस्मरण पक्के झालेले नाही. आपणांस ऐकू येणारा ध्वनीचा आवाजदेखील सतगुरूंचाच असतो, परंतु तो आवाज आपणांस अंतर्यातून वरती खेचत नाही, कारण आपला आत्मा त्यास आकर्षित करू शकणाऱ्या शक्तीच्या सीमेमध्ये गेलेला नसतो.

इच्छाधारी सर्पाचे शरीर अतिशय जड असते. त्यामुळे तो स्वत: भक्ष्याकडे जात नाही. परंतु जे भक्ष्य त्या सर्पाच्या सीमेमध्ये येते, ते सर्पाकडे आकर्षित होत त्याच्या मुखात जाते. याचप्रमाणे आपले लक्ष जेव्हा ध्वनीच्या सीमेमध्ये जाईल, तेव्हा तो ध्वनी त्यास वर खेचून घेईल व आपली पाहू शकणारी शक्ती निरत जागृत होईल. परंतु अशावेळी उदास झालेला सेवक विचार करू लागतो की, कदाचित मी अंतर्यामध्ये गुरू–स्वरूप पाहण्यालायक

नाही वा सतगुरू मला काही देऊ इच्छित नाहीत. प्रियजनहो! असे कधी नसते. सतगुरू तर आपणांस देण्यासाठी दोन्ही हातांमध्ये बक्षिस घेऊन आपली वाट पाहत उभे असतात. परंतु आपण त्या ठिकाणापर्यंत पोहोचलेलो नसतो. आपण जगातील गोष्टींचे स्मरण करण्यात मग्न असतो. अशावेळी आपण करीत असलेल्या स्मरणाची पडताळणी करून पाहावी, की स्मरण कसे करीत आहोत? आपणांस जगाचे स्मरण करण्याची जन्मोजन्मांतराची सवय असते. अंतर्यात ध्वनीचा आवाज जोरात येत असतो, परंतु आपले मन मात्र जगाचे स्मरण करीत असते.

मी जुन्या काळातील गोष्ट सांगतो की संत त्यांच्या सेवकांना अगोदर नाम देत असत. नामस्मरण पक्के झाल्यावर ते सेवकांना ध्वनीची माहिती देत असत. परंतु यामध्ये कधी-कधी नुकसान असे होते असे की नाम दिल्यानंतर कधी सतगुरू शरीर त्यागून जात असत तर कधी शिष्य शरीर सोडत असत. त्या सेवकाचे नामदानाचे काम अपूर्णच राहत असे. धुनात्मक नामाद्वारेच आपणांस मुक्ती मिळू शकते. शरीराची नऊ द्वारे रिक्त करून ध्वनीशी जोडले जाण्यासाठी नामस्मरण हे माध्यम आहे. ही कबीर साहेबांची आत्म्यांवर खास कृपा झाली की कलियुगामध्ये एकत्रच नामदान दिले जाते.

आता उरलेला मुद्दा म्हणजे आपण गुरूस्वरूपाचे अंतर्यातून दर्शन प्राप्त करण्यासाठी लायक आहोत वा नाही? गुरू अर्जुनदेवजींच्या वेळी प्रत्येक सत्संगीची अंतर्यातून उन्नती एकत्रच करवून घेतली जाई. सत्संगीच्या लक्षात येई की मी कोठे पोहोचलो आहे? माझी किती उन्नती झाली आहे? परंतु अनेक सेवक त्यांनी केलेली नामाची कमाई सांभाळून ठेवत नसत. ते इतर लोकांना चमत्कार करून दाखवित त्यांची कमाई वाया घालवित असत. चमत्कार करून दाखविणे अतिशय कठोर कर्म आहे. यांपासून आपणांस सांभाळून नेण्याची संतांची इच्छा असते.

एकदा काबूल येथे एका घरामध्ये काही सत्संगी मुक्कामी राहिले होते. तेव्हा त्या घरातील एका बालकाचा मृत्यू झाला. त्या घरातील लोक करीत

असलेला शोक–विलाप सत्संगीना पाहवला नाही. त्यांनी त्या मुलास जीवित केले. त्या सत्संगींवर गुरू अर्जुनदेवजी अतिशय नाराज झाले. ते म्हणाले, असे तुम्ही लोकांनी का केले? संत निसर्गाच्या नियमानुसारच आपले आयुष्य जगतात व आपल्या मुलांना देखील सांगतात की आपण परमात्म्याचा पातीदार बनण्याचा प्रयत्न करू नये.

त्या काळापासून आत्म्यावर एक प्रकारचा पडदा टाकला गेला, ज्यामुळे त्याची अध्यात्मिक उन्नती किती झाली आहे, याचे त्यास ज्ञान होऊ नये. जे प्रेमी सांसारीक मान–मोठेपणासाठी किंवा दु:खद समयी त्यांची नामाची कमाई व्यर्थ घालवणार नाहीत, याची सतगुरूंनी खात्री पटते, अशा प्रेमींना त्यांनी स्वत: केलेली कमाईदेखील सुपूर्द करताना ते मागेपुढे पाहत नाहीत.

प्रियजनहो! हे तर आपणांस या जगातील आई–वडिलांमध्ये सुद्धा पाहावयास मिळते की, जी मुले लायक असतात त्या मुलांचे आई–वडील त्यांच्या हयातीमध्येच स्वत:ची पूंजी त्यांच्या सुपूर्द करतात व त्यास शाबासकी देखील देतात, की माझा मुलगा अतिशय लायक आहे. जी मुले त्यांच्या घराची जबाबदारी सांभाळत नाहीत, त्यांचे आई–वडील आतल्याआत किती चिंताग्रस्त असतात.

मी जेव्हा अमेरिका, कोलंबिया किंवा इतर कोणत्याही देशांमध्ये जातो, तेव्हा मला दोन्ही प्रकारचे परिवार भेटावयास येतात. ज्या मुलांना स्वत:च्या घराच्या जबाबदारीची जाणीव असते. जे त्यानुसार स्वत:मध्ये बदल घडवितात. त्यांचे आई–वडील मला अतिशय प्रेमाने–आपुलकीने भेटावयास येतात. माझे आभार मानतात की तुम्ही आमच्या मुलांसाठी खूप मेहनत घेतलीत. जी मुले स्वत:मध्ये बदल घडवित नाहीत, त्यांचे आई–वडीलदेखील कधी–कधी मला प्रेम–आपुलकीने भेटतात व म्हणतात की, तुम्ही करीत असलेला उपदेश चांगलाच आहे, परंतु या भल्या माणसास घराची जबाबदारीदेखील समजून घेण्यास सांगा. म्हणूनच कबीर साहेब सांगतात:

*माड़ा कुत्ता खसमे गाली ।*

प्रियजनहों! सतगुरू तर तना–मनाने आपल्या मुलांच्या भल्याचा विचार करतात. ते नेहमीच सत्संगामध्ये समजावतात की तुम्ही सद्गृहस्थ बना! मी नेहमी सांगत असते की सत्संगी जेवढे सद्गुणी असतील, इतर लोकदेखील त्यापासून लाभ करून घेतील. कमीत कमी इतरांना याची तरी माहिती व्हावी की हा अमुक–अमुक संतांकडे जातो, त्यामुळे त्याच्यामध्ये बदल घडला, हे संतांचे सेवक आहेत.

या प्रश्नाचा एक भाग हा देखील आहे की सतगुरू आपणांस त्यांच्या लायक समजत नाहीत? प्रियजनहो! सत्संगीने असा कदापिही विचार करू नये. त्यांनी आपणांस लायक मानूनच आपणांस नामदान दिले आहे, आपल्या अंतरांमध्ये नाम ठेवून आपल्या आत्म्याचे दान दिले आहे. ध्यान–अभ्यास करीत सत्संगी जेव्हा अंतर्यात जातो तेव्हा तो पाहतो की सतगुरूंनी माझ्यासाठी किती संघर्ष केलेला आहे व किती त्रास त्यांनी माझ्यासाठी सहन केला आहे? सतगुरू सेवकासाठी काय काय करीत आहेत? प्रियजनहो! सतगुरू या जगात देण्यासाठीच आलेले असतात. त्यांना देण्यातच आनंद वाटतो.

आपल्या परमपित्या कृपालजींनी २६ वर्षे संदेश दिला की, ‘देणाऱ्याचा काय दोष? प्रश्न तर घेणाऱ्याचा आहे.’ जशी जशी आपण आपली पात्रे बनविली आहेत, त्यानुसारच आपण त्या महान संतापासून प्राप्ती करून घेतली आहे. ते सचखंडात जाऊन आपणांस विसरले नाहीत, उलट आजही ते आपणांस देत आहेत, आपला सांभाळ करीत आहेत. हे सत्य आहे.

प्रियजनहो! म्हणूनच आपले कर्तव्य आहे की आपण स्वत:स पात्र बनवावे. सतगुरू देत असलेल्या दयेवर शंका व्यक्त करु नये, तसेच असा विचारही करू नये की ते आपणांस देऊ इच्छित नाहीत. ते तर देण्यासाठीच आलेले आहेत.

***

# अमृतवेळ

परम संत अजायब सिंह महाराजजींनी ध्यान-अभ्यासास बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश - १६पी एस राजस्थान - १० ऑक्टोबर १९८१

आपण गेले तीन-चार दिवस सत्संग ऐकत आहात. त्या सत्संगांमध्ये मी तुम्हांस हेच समजावण्याचा प्रयत्न केला की आपण ध्यान-अभ्यास करणे का व किती गरजेचे आहे? ज्यास परमात्म्याची कृपा प्राप्त करण्याची इच्छा आहे, त्याने अधिकाधिक ध्यान-अभ्यास व नामस्मरण करावयास हवे.

सतगुरूंद्वारे कृपेचा वर्षाव सातत्याने होत असतो. परमात्मा कधीच अन्याय करीत नाही. तो प्रत्येकास त्याने केलेल्या परिश्रमाचे फळ देतो. ज्याप्रमाणे आई-वडिलांना त्यांची मुले प्रिय असतात, त्याचप्रमाणे प्रभू-परमात्म्यास त्याची भक्ती, ध्यान-अभ्यास करणारे प्रेमी प्रिय असतात.

तुम्ही जे काही या कार्यक्रमामध्ये श्रवण केलेत त्यावर अमल करून स्वत:चे जीवन पवित्र बनविणे गरजेचे आहे. जेवढे आपले शरीर पवित्र असेल, तेवढेच मन पवित्र राहिल व जेवढे आपले मन पवित्र राहिल, तेवढाच आपला आत्मादेखील पवित्र राहिल. परमात्मा पवित्र आहे. आपला आत्मा पवित्र असल्यास, त्यास परमात्मा त्वरीत स्वत:मध्ये विलीन करून घेतो.

आपण ध्यान-अभ्यास करण्याचा व स्वत:चे जीवन पवित्र बनविण्याचा प्रयत्न करावयास हवा. आपण आपल्या सांसारीक जबाबदाऱ्या पूर्ण करीत आपला ध्यान-अभ्यास करावा.

# धन्य अजायब

**सन्त बानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान येथील कार्यक्रमांच्या तारखा:**

**१ ते ३ ऑगस्ट २०१४ ● ७ ते ११ सप्टेंबर २०१४ ● २४ ते २६ ऑक्टोबर २०१४**

**२८ ते ३० नोव्हेंबर २०१४ ● २६ ते २८ डिसेंबर २०१४**

**मुंबई शहरातील कार्यक्रमाच्या तारखा : ७ ते ११ जानेवारी २०१५**